## ॥ पृथ्वीवरील तारांगण ॥

जॉगर्स ट्रॅक नव्हे हे तर पृथ्वीवरील तारांगण
अवतरती इथे ग्रह, तारे व तारका जॉगर्सच्या रूपात!
प्रत्येकाची उदयाची व अस्ताची वेळ ठरलेली
अर्थात ऋतुकालाप्रमाणे थोडी थोडी बदलणारी!
काही जॉगर्स संथ/मंद तर काही जलद/शीघ्र गतीचे
काही दिसतात प्रभात काळी तर काही संध्यासमयी
तर काही दिसतात दोहोसमयी!
काही वृध्द तर काही तरूण तर काही चिरतारूण्याचे वरदान लाभलेले
प्रत्येकाची भ्रमण दिशा असे भिन्न, कोणी ध्रुवाचा अनुयायी तर
कुणी शुक्राचा!
कोणी येती एकटे (एकला चलो रे जैसे) वा फिरती जोडीने
तर काही फिरती तारकापुंजासारखे घोळक्याने!
काही उगवती नियमीत इष्टसमयी, काही अधूनमधून
तर काही धूमकेतूचे स्नेही!
कोणी भासतो मंगळासम तांबूस तर कोणी शुक्रासारखा तेजस्वी
काही चंद्रासम शीतल, तर काही शनिसम गंभीर!
काही बुधासारखे सडपातळ तर काही गुरूसम अवाढव्य!
म्हणती तारांगणे आहेत अनेक अवकाशात
तसेच ट्रॅक्स असती भूवरी अनेक
प्रत्येक ट्रॅकची दिसे शोभा
वेगवेगळी, वेगवेगळ्या दिवस-वारांनिशी
असते इथे पौर्णिमा शनिवारी
तर अमावास्या असते इथे रविवारी!

डॉ. शिरीष श्री. साने
कुमारी अनघा क. साने